दै. ऐक्य २७ जुलै २०२२

# साताऱ्यात शुक्रवारी गर्भाशय मुख कॅन्सर प्रतिबंधात्मक मोफत लसीकरण

▲ **सातारा,** दि. २६ : आधार चॅरिटेबल ट्रस्ट, कर्तव्य सोशल ग्रुप, कॅन्सर पेशंट अँड असोसिएशन, स्त्रीरोग प्रसूतिशास्त्र असोसिएशन, सातारा, यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २९,३०,३१ जुलै रोजी आधार आय. सी. यू. अँड मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, सातारा येथे गर्भाशय मुखाचा कॅन्सर प्रतिबंधात्मक मोफत लसीकरण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. शुक्रवार, दि. २९ रोजी सकाळी ९ वाजता श्रीमंत सौ. वेदांतिकाराजे भोसले यांच्या प्रमुख उपस्थितीत या शिबिराचा शुभारंभ होणार आहे.

ह्युमन पापिलोमा व्हायरस हा गर्भाशयाचे मुखाचा कॅन्सर उत्पन्न करू शकतो. त्याला आळा घालण्यासाठी ही लस प्रभावी ठरत असल्याचा वैज्ञानिकांनी दावा केला आहे. २००८ पासून बाजारात ही लस उपलब्ध असून याला भारतात मान्यता आहे. पण या लसीची किंमत बाजारामध्ये जास्त असल्याने सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहोचत नाही. सामाजिक बांधिलकी म्हणून वरील सर्व संस्थानी एकत्र येवून एक हजार मुलींना (८ ते १८ वयोगट) ही लस मोफत देण्याचा उपक्रम हाती घेतला आहे. गर्भाशय मुखाचा कॅन्सर हा जीवघेणा ठरू शकतो पण आत्तापर्यंत प्रतिबंधात्मक लस उपलब्ध नव्हती. ही लस सातारा जिल्ह्यामध्ये प्रथमच उपलब्ध करून या संस्थांनी सातारकरांची मान उंचावली आहे.

लसीकरणासाठी मुंबई येथील कॅन्सर रुग्ण अँड असोसिएशनच्या वतीने डॉ. धनंजय सारनाथ, डॉ. अर्जुन शिंदे, भावना शर्मा यांनी पुढाकार घेऊन सदर लस मोफत उपलब्ध करून दिली आहे. याचा फायदा सध्या एक हजार मुलींना मिळणार आहे. भविष्यातही आणखी लस उपलब्ध करून देण्याचा मानस आहे, असे कर्तव्य सोशल ग्रुपच्या संस्थापिका सौ. वेदांतिकाराजे भोसले, आधार हॉस्पिटलचे संचालक डॉ. देवेंद्र पाटील, डॉ. तेजस भोसले, डॉ. अरविंद गावडे, डॉ. जयेंद्र जाधव, डॉ. कबीर मुलानी, डॉ. मिलिंद सुर्वे, डॉ. चैतन्य काळे, डॉ. सागर भोकरे, डॉ. राहुल साळुंखे यांनी सांगितले.

लोकमत २८ जुलै २०२२

# साताऱ्यात शुक्रवारी गर्भाशय मुख कॅन्सर प्रतिबंधात्मक लसीकरण शिबिर

लोकमत न्यूज नेटवर्क

**सातारा :** आधार चॅरिटेबल ट्रस्ट, कर्तव्य सोशल ग्रुप, कॅन्सर पेशंट अँड असोसिएशन, स्त्रीरोग प्रसूतीशास्त्र असोसिएशन सातारा, यांच्या वतीने शुक्रवारी (दि.२९) आधार आयसीयू अँड मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटल, सातारा येथे गर्भाशय मुख कॅन्सर प्रतिबंधात्मक मोफत लसीकरण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. वेदांतिकाराजे भोसले यांच्या प्रमुख उपस्थितीत सकाळी नऊ वाजता शिबिराचे उद्घाटन केले जाणार आहे.

ह्युमन पापिलोमा व्हायरस हा गर्भाशय मुखाचा कॅन्सर उत्पन्न करू शकतो. त्याला आळा घालण्यासाठी ही लस प्रभावी ठरत असल्याचा वैज्ञानिकांनी दावा केला आहे. २००८ पासून बाजारात ही लस उपलब्ध असून याला भारतात मान्यता आहे पण या लसीची किंमत बाजारामध्ये जास्त असल्याने सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहोचत नाही.

सामाजिक बांधिलकी म्हणून वरील सर्व संस्थानी एकत्र येऊन एक हजार मुलींना (८ ते १८ वयोगट) ही लस मोफत देण्याचा उपक्रम हाती घेतला आहे. गर्भाशय मुखाचा कॅन्सर हा जीवघेणा ठरू शकतो पण आत्तापर्यंत प्रतिबंधात्मक लस उपलब्ध नव्हती. ही लस सातारा जिल्ह्यामध्ये प्रथमच उपलब्ध करून या संस्थांनी सातारकरांची मान उंचावली आहे. लसीकरणासाठी मुंबई येथील कॅन्सर पेशंट अँड असोसिएशनच्या वतीने डॉ. धनंजय सोरनाथ, डॉ. अर्जुन शिंदे, भावना शर्मा यांनी पुढाकार घेऊन सदर लस मोफत उपलब्ध करून दिली आहे.

याचा फायदा सध्या एक हजार मुलींना मिळणार आहे पण, भविष्यात आणखी लस उपलब्ध करून देण्याचा मानस आहे, असे कर्तव्य सोशल ग्रुपच्या संस्थापिका वेदांतिकाराजे भोसले, आधार हॉस्पिटल, साताराचे संचालक डॉ. देवेंद्र पाटील, डॉ. तेजस भोसले, डॉ. अरविंद गावडे, डॉ. जयेंद्र जाधव, डॉ. कबीर मुलानी, डॉ. मिलिंद सुर्वे, डॉ. चैतन्य काळे, डॉ. सागर भोकरे, डॉ. राहुल साळुंखे यांनी सांगितले.